# कुळगाव बदलापूर नगरपरिषद

## दीनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | श्री.चारुदत्त भीमराव सोनवणे | व्यवस्थापक,सामाजिक विकास व पायाभूत सुविधा | ८३८०००७०१७ |
| २. | श्रीमती.मोहिनी रतनराव पाटील | समुदाय संघटक | ८३८०००७०३७ |

**दीनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान**

**योजनेची उद्दिष्टे :-**

- नागरी गरीब लोक,त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे,उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्र्य निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे.
- नागरी गरीब कुटुंबातील व्यक्तींना उपजीविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे.
- बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार,विवध क्षेत्राच्या गरजा लक्षात घेवून नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- नागरी गरिबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.
- नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मुलभूत सोयी सुविधा असलेल्या निवा-याची सोय करणे.
- नागरी फेरीवाल्यांचा उपजीविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

**अभियानाची उपांगे :-**

- **सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी.(Social Mobilization and Institutional Development)**
- **कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता(Employment Through Skill Training & Placement)**
- **स्वयंरोजगार कार्यक्रम.(Self Employment Programme)**
- **फेरीवाल्यांना सहाय्य.(Support to Urban Street Venders)**
- **शहरी बेघरांसाठी निवारा.(Scheme of Shelter for Urban Homeless)**

| अ.क्र. | सेवेचे नाव |
|---|---|
| १ | **सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी .(Social Mobilization and Institutional Development)**<br><br>**अ)स्वयं सहायता गट ( Self Help Group)** दारिद्र्य रेषेखालील महिलांचे बचत गट तयार करणे.व ज्या बचत गटांना ३ महिने पूर्ण झालेले आहेत.त्यांचे मूल्यमापन करून त्यांना फिरता निधी देणे..<br>**वस्तीस्तर संघ (Area Level Federation)**तयार करण्यासाठी प्रतिनधीची निवडप्रक्रिया करून वस्तीस्तर संघ स्थापन करणे.<br>**शहरस्तरावरील समूह (City Level Federation)**वस्तीस्थर संघ स्थापन झाल्यानंतर शहर स्थर संघ स्थापन करणे.<br>· **शहरी गरिबांना स्वयंसहाय्य गटामध्ये सामावून घेणे** : ALF व SHG द्वारा स्वयंसहाय्यता गटांमध्ये सामील न झालेल्या शहरी गरिब लाभार्थ्यांना गटामध्ये सामील होण्यासाठी भाग पाडणे.<br>**कौशल्य व व्यवसाय आराखडा यांची गाळणी व छाननी करणे** : SHG ने बनविलेल्या कौशल्य व व्यवसाय आराखडा यांची ALF स्तरावर छाननी करून सदर आराखडे ULB मध्ये सादर करणे. यासाठी शहर अभियान व्यवस्थापक, समुदाय संघटक, संसाधन संस्था यांची मदत घेणे.<br>**कौशल्य व व्यवसाय आराखडा यांचा पाठपुरावा** : SHG व ALF द्वारा सादर कौशल्य |

| | |
|---|---|
| | प्रशिक्षणाच्या आवश्यकतेनुसार त्यांना ESTP अंतर्गत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात यावेत तसेच गटांद्वारे सादर व्यवसाय आराखड्यानुसार त्यांचे कर्जांचे प्रस्ताव SEP घटकांतर्गत TFC मार्फत बँकांना मंजुरीस्तव सादर करणे. |
| २ | **कौशल्य प्रशिक्षण:- (Employment Through Skill Training & Placement)**<br>अभियानाच्या या घटकांतर्गत बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार,विविध क्षेत्राच्या गरजा लक्षात घेवून नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. |
| ३ | **३)स्वयंरोजगार कार्यक्रम:- (Self Employment Programme)**<br>दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत स्वयंरोजगार वैयक्तिक- या उपांगमध्ये वैयक्तिक प्रस्ताव बँकेत दाखल करणे २ लाखांपर्यंत कर्ज बँक मार्फत ७%च्या वरचे व्याज अनुदान देण्यात येते.२)व्यवसाय गट-या घटकांअंतर्गत १० लाखांपर्यंत बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाते व दारिद्र्य रेषेखालील बचत गटाला कर्ज १० लाखांपर्यंत बँकेमार्फत ४% व्याज अनुदानाने कर्ज उपलब्ध करून दिले जाते यांचे सर्व प्रस्ताव टास्क फोर्स कमेटी मध्ये निर्णय घेऊन दाखल करणे . |
| ४ | **४)फेरीवाला धोरण -;(Support to Urban Street Venders)**<br>शहरातील फेरीवाल्यानाचा विकास करण्याकरिता त्यांचे सर्वेक्षण करून त्यांना नोंदणी प्रमाणपत्र व ओळख पत्र देणे व फेरीवाला धोरण निश्चित करून सहाय्य करणे |
| ५ | **५)बेघरांसाठी निवारा-; (Scheme of Shelter for Urban Homeless)**<br>अभियानाच्या या घटकांतर्गत शहरातील बेघर लोकांसाठी निवा-याची सुविधा उपलब्ध करून देणे. |